udyan.doc- -



सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/१५७०
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि. २५/११/२०१७

## -: जाहिरात :-

## WALK - IN- INTERVIEW

दि. ०७/१२/२०१७, वेळ दुपारी १२.३० वाजतां
अर्ज स्विकारण्याची दिनांक ०७/१२/२०१७ - वेळ सकाळी १० ते १२
स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे इलेक्ट्रीक सुपरवायझर (इलेक्ट्रीक अवेक्षक) या पदी तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र . | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रीक सुपरवायझर (इलेक्ट्रीक अवेक्षक) | २ (दोन) . | मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या विद्युत (इलेक्ट्रीक) अभियांत्रिकीचा पदवीकाधारक (डी.ई.इलेक्ट्रीक) पदवी धारक (बी.ई. इलेक्ट्रीक), एम.ई. इलेक्ट्रीक., एम.टेक (इलेक्ट्रीक) असणारे उमेदवारास प्राधान्य. किमान १ वर्षे शासकिय / निमशासकिय कामाचा अनुभव असणा-या उमेदवांराना प्राधान्य. | एकवट मानधन रुपये २०,०००/- (र.रु.वीस हजार ) यावर सहा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

शर्ती व अटी :-

१) वयोमर्यादा :- दि.०१/११/२०१७ रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

४) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

५) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

६) कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहातील.

७) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

८) सदरचे जाहिरात तसेच इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.org व www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

संगणक विभाग
आवक क्र.:- 365
दि.:- 29/11/2017

सोलापूर महानगरपालिका



इतर शर्ती व अटी

इलेक्ट्रीक सुपरवायझर (इलेक्ट्रीक अवेक्षक) या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता खालीलप्रमाणे इतर शर्ती व अटी खालील प्रमाणे राहतील.

१) सदरची नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर राहील. सदरचे करार पत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून दयावे लागेल.

२) सदर पदावरील नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता असून पूर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील. नियुक्तीस सहा महिन्यानंतर आपली नियुक्ती व्यपगत होइल.

३) याकामी करारपध्दतीने दरमहा रुपये २००००/- इतके एकवट मानधन दिले जाईल. तसेच आपली नियुक्ती ही करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही. व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

४) नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

५) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

६) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा मला हजर करणे बंधनकारक आहे.

७) सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

८) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट वेतन (पगाराची) रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक आहे.

९) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन त्यांचे विरुध्द कोणतेही गुन्हे नोंदविण्यात आलेले नाही अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही याबाबत म.न.पा. कडून खात्री करण्यात येईल.

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.